सकाळ




फुलेवाडी : 'बापू' स्मृतिग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. डी. टी. शिर्के, वैभवकाका नायकवडी, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. सुनीलकुमार लवटे.

# 'स्वतःसह दुसऱ्याची काळजी घेण्याचा धर्म बापूंनी जपला'

**फुलेवाडी, ता. २५ :** स्वतःच्या कुटुंबाबरोबर दुसऱ्याची काळजी कशी घ्यावी, हा धर्म गजानन बळवंत पाटील (बापू) यांनी जपला. त्यांच्यावरील 'बापू' हा ग्रंथ वाचत असताना मीही या कुटुंबाचा घटक आहे, असे मला जाणवले, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. स्मृतिग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. साहित्यिक प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. लवटे म्हणाले, "या पुस्तकातले बापू व त्यांचे नातेवाईक प्रातिनिधिक आहेत. वर्तमानात अस्वस्थ करणारा हा ग्रंथ असून, कुटुंबातलं जगणं कस आदर्श असावं याचा पाठ देणारा हा ग्रंथ आहे." प्रा. विनय पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी परिचय करून दिला. डॉ. कविता गगराणी, डॉ. विजयाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. व्ही. जी. पाटील यांनी आभार मानले. वाचनकट्टा संस्थेचे युवराज कदम, प्रा. अविनाश पाटील व दिलीप पाटील यांचा सत्कार झाला. संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील, अध्यक्ष बी. जी. बोराडे, हुतात्मा उद्योग व शिक्षण समूहाचे प्रमुख वैभवकाका नायकवडी, अनु आसगावकर, शाहीर आझाद नायकवडी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठाचे 'क्रांतिवन'

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात शिवाजी विद्यापीठाच्यावतीने क्रांतिवन साकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठ परिसरात होत असलेल्या या क्रांतिवनात स्वातंत्र्यसैनिकांच्या शिल्पाकृती, त्यांचे कार्य, स्वातंत्र्यलढ्यातील आठवणी साकार होणार आहेत. तरुण पिढीला स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य माहीत होण्यासाठी त्याचा मोलाचा उपयोग होणार आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाला क्रांतिवनाद्वारे उजाळा देणारे शिवाजी विद्यापीठ हे भारतातील पहिलेच विद्यापीठ आहे. या बहुमोल कामगिरीबद्दल स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसदारांतर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना मनःपूर्वक धन्यवाद.

**शरद तांबट, कोल्हापूर**

26 OCT 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्य फेन्सिंगचे औरंगाबादला सर्वसाधारण विजेतेपद

## स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्याला उपविजेतेपद

कोल्हापूर, ता. २५ : ३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत औरंगाबाद संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळविले. फॉईल वैयक्तिकमध्ये दोन्ही गटांत इपी व सायबरच्या दोन्ही गटांत औरंगाबादच्या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवत वर्चस्व गाजविले. कोल्हापूर उपविजेता ठरला. आमदार चंद्रकांत जाधव व जिल्हा पोलिसप्रमुख शैलेश बलकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.



कोल्हापूर : येथे सोमवारी राज्यस्तर वरिष्ठ गट फेन्सिंग स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या औरंगाबादच्या पुरुष व महिला संघाला पारितोषिक देताना डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, आमदार चंद्रकांत जाधव व जिल्हा पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन संयोजक होते. आज शेवटच्या दिवशी सायबर सांघिक प्रकारात औरंगाबादने महिला व पुरुष गटाचे सुवर्णपदक पटकावले. महिला गटात कशीश भरड, संस्कृती पडुल, अपूर्वा रसाळ व गार्गी डोंगरे यांचा समावेश असलेल्या औरंगाबाद संघाने तेजस्विनी तारळे, दुर्गा नांदुर्डीकर, आदिती सोनवणे यांचा सामवेश असलेल्या नाशिक संघावर विजय मिळविला. शर्वरी गोसेवडे, विज्ञानी उमठ, काजल गुप्ता व श्रुती जोशी यांच्या नागपूर आणि उर्वरी मानकर, निशा पुजारी, प्राची सिंग व सृष्टी औसरकर यांच्या ठाणे संघाला कांस्यपदक मिळाले.

पुरुष सांघिक गटात अभय शिंदे, श्रेयस जाधव, विशाल दानवे व निघाली वाघ यांच्या औरंगाबाद संघाने कोल्हापूरला पराभूत करीत सुवर्णपदक जिंकले. धनंजय जाधव, प्रतीक पाटील, श्रीशैल्य शिंदे व ऋषीराज पोवार आदी कोल्हापूर संघात होते. यश सोनटक्के, मुकुल भेंडारकर, मुशर्रफ खान व आयुष कहाते यांच्या नागपूर व सोमुशंकर मोपन्नवर, धीरज माने व शिवा यादव यांच्या पालघर संघाने कांस्यपदक मिळविले.

### 'सायबर'मध्ये औरंगाबादचा दबदबा

सायबर वैयक्तिक दोन्ही गटांत औरंगाबादने सुवर्णपदक पटकावले. पुरुष गटात अभय शिंदेला सुवर्ण, कोल्हापूरच्या प्रतीक जाधवला रौप्य, तर श्रीशैल शिंदे व पार्थ जाधवला कांस्यपदक मिळाले. मुलींमध्ये औरंगाबादच्या कशीश भरडला सुवर्ण, नागपूरच्या श्रुती जोशीला रौप्य, तर औरंगाबादच्या अपूर्वा रसाळ व लातूरच्या माही आरदवाडला कांस्यपदक मिळाले.

### फॉईल वैयक्तिकमध्येही औरंगाबाद

फॉईल वैयक्तिक प्रकारात पुरुष गटात औरंगाबादच्या शाकेर सय्यदने सुवर्णपदक जिंकले. कोल्हापूरच्या अनिल मठपतीला रौप्य, तर पालघरच्या शीव यादव व औरंगाबादच्या तेजस पाटीलला कांस्यपदक मिळाले. महिला गटात औरंगाबादच्याच वैदेही लोहियाने मुंबईच्या वैभवी इंगळेचा पराभव करीत सुवर्णपदक जिंकले. मुंबई उपनगरच्या खुशी दुखंडे व पालघरच्या अनुजा लाडला कांस्यपदक मिळाले.

आयोजन समितीचे अध्यक्ष संजय जाधव, सचिव विनय जाधव, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राम पोवार, गजानन बेडेकर, राहुल मगदूम, प्रफुल्ल धुमाळ, संदीप जाधव, संभाजी मिरजे, दीपक क्षीरसागर यांच्यासह जिल्हा संघटनेचे पदाधिकारी व संयोजन समितीने स्पर्धेचे नेटके संयोजन केले.

राज्य संघात कोल्हापूरचे पाच जण

स्पर्धेतून निवडलेला २४ जणांचा संघ जानेवारीत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल. त्यात कोल्हापूरच्या चौघांचा समावेश आहे. संघ असा :

फॉईल- शाकेर सय्यद (औरंगाबाद), अनिल मठपती (कोल्हापूर), शिव यादव (पालघर), तेजस पाटील (औरंगाबाद). महिला- वैदेही लोहिया (औरंगाबाद), वैभवी इंगळे (मुंबई), खुशी दुखंडे (मुंबई उपनगर), अनुजा लाड (पालघर).

ईपी- प्रथमकुमार शिंदे (कोल्हापूर), गिरीश जकाते (सांगली), निखिल कोहाड (भंडारा), मोरेश्वर पाटील (सांगली); महिला- माही आरदवाड (लातूर), नम्रता यादव (पालघर), ज्ञानेश्वरी शिंदे (लातूर), वामा मणियार (पालघर).

सायबर- अभय शिंदे (औरंगाबाद), प्रतीक जाधव (कोल्हापूर), श्रीशैल शिंदे (कोल्हापूर), पार्थ जाधव (कोल्हापूर).

सायबर मुली- कशीश भरड (औरंगाबाद), श्रुती जोशी (नागपूर), अपूर्वा रसाळ (औरंगाबाद), माही आरदवाड (लातूर).

26 OCT 2021
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'औरंगाबाद'ची तलवारबाजी राज्यात भारी

## राज्य फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धा : यजमान कोल्हापूर संघाला उपविजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बत्तीसाव्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग स्पर्धेत औरंगाबाद संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. यजमान कोल्हापूर संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. फॉईल, ईपी व सेबर प्रकारात वैयक्तिक, सांघिक अशा दोन्ही गटांत औरंगाबादच्या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवीत वर्चस्व सिद्ध केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सोमवारी स्पर्धेतील अखेरच्या दिवशी सेबर गटात औरंगाबाद संघाने महिला व पुरुष गटात सुवर्णपदक पटकाविले. महिला गटात विजेत्या औरंगाबाद संघात कशीश भरड, संस्कृती पडुल, अपूर्वा रसाळ, गार्गी डोंगरे यांचा समावेश होता. उपविजेत्या नाशिक संघात तेजस्विनी तारळे, दुर्गा नांदुरडीकर, आदिती सोनवणे यांचा समावेश होता, तर कांस्य पदकाचे मानकरी ठरलेल्या नागपूर संघात शर्वरी गौसेवड, विज्ञानी उमठ, काजल गुप्ता व श्रुती जोशी यांचा, तर ठाणे संघात उर्वरी मानकर, निशा पुजारी, प्राची सिंग, सृष्टी औसकर यांचा समावेश होता.




शिवाजी विद्यापीठात फेन्सिंग स्पर्धेचे विजेतेपद पटकाविणाऱ्या औरंगाबाद संघास विजेतेपदाचा चषक डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते व आमदार चंद्रकांत जाधव, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी देण्यात आला. यावेळी डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलगुरु डॉ. शिंपा शर्मा, आदी उपस्थित होते.

पुरुष गटात औरंगाबाद संघाने यजमान कोल्हापूरचा पराभव केला. सुवर्ण विजेत्या औरंगाबाद संघात श्रेयस जाधव, अभय शिंदे, विशाल दानवे, निघाली वाघ यांचा, तर उपविजेत्या (रौप्य ) कोल्हापूर संघात धनंजय जाधव, प्रतीक पाटील, श्रीशैल्य शिंदे, ऋषिराज पोवार यांचा समावेश होता. कांस्यपदक विजेत्या नागपूर संघात यश सोनटक्के, मुकुल भंडारकर, मुशर्रफ खान, आयुष कहाते व पालघर संघात धीरज माने, शिवा यादव, सोमुशंकर मोपन्नवर यांचा समावेश होता.

स्पर्धेचा बक्षीस समारंभ डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील , आमदार चंद्रकांत जाधव, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे यांच्या हस्ते झाला. यावेळी डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र-कुलुगुरू डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव विश्वनाथ भोसले, डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक ए. के. गुप्ता, वित्त अधिकारी श्रीधर स्वामी, प्राचार्य डॉ. महादेव नरके, प्रा. किसनराव कुराडे, महाराष्ट्र फेन्सिंग महासंघाचे पदाधिकारी अशोक दुधारे, प्रकाश काटोळे, उदय डोंगरे, राजकुमार सोमवंशी, संयोजन समितीचे संजय जाधव व जिल्हा सचिव विनय जाधव, आदी उपस्थित होते.

### फॉईल वैयक्तिकमध्ये औरंगाबादचेच वर्चस्व

फॉईल वैयक्तिक विजेते असे : शाकेर सय्यद, औरंगाबाद (सुवर्ण), अनिल मठपती, कोल्हापूर (रौप्य), शिव यादव, पालघर व तेजस पाटील, औरंगाबाद (दोघेही कांस्य), तर महिलांमध्ये वैदेही लोहिया, औरंगाबाद (सुवर्ण), वैभवी इंगळे (रौप्य), खुशी दुखंडे, मुंबई उपनगर, अनुजा लाड, पालघर (दोघीही कांस्य).

लोकमत

# एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा आजपासून

कोल्हापूर : मार्च-एप्रिल दरम्यानच्या उन्हाळी सत्रातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ५२३ परीक्षांचे निकाल शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सोमवारपर्यंत जाहीर केले. आता केवळ वीस परीक्षांचे निकाल शिल्लक राहिले आहेत.

एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा मंगळवार (दि. २६) पासून सुरू होणार आहे. उन्हाळी सत्रात विद्यापीठाने एकूण ५४३ परीक्षा ऑनलाईन घेतल्या. एम. एस्सी. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या ४५ विद्यार्थ्यांनी सोमवारी ऑनलाईन परीक्षा दिली. बी. एस्सी., एम. एस्सी. या परीक्षांचे निकाल जाहीर केले. सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाकडून मंगळवार ते गुरूवारदरम्यान एम. फिल., पीएच. डी. प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय (कोल्हापूर), मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय (सांगली), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (सातारा) या महाविद्यालयांमध्ये परीक्षा होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून आजअखेर ५२३ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून आजअखेर सुमारे ५२३ विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. परीक्षा विभागाकडून सोमवारी बी.एस्सी. व एम.एस्सी. नॅनो सायन्स अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. सोमवारी एम.एस्सी. अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. ऑनलाईन परीक्षेला ४५ विद्यार्थी बसले होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

पुढारी

# अधिविभाग स्वायत्ततेची अधिकार मंडळाकडे शिफारस

## विद्या परिषद बैठकीत मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, प्राणीशास्त्र व अर्थशास्त्र विभागाचा स्वायत्ततेचा प्रस्ताव पुढील अधिकार मंडळापुढे ठेवण्याची शिफारस विद्या परिषद बैठकीत करण्यात आली.

**शिवाजी विद्यापीठातून...**

विद्या परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी झाली. विविध विषयांवर चर्चा झाली. यात एमबीए, बीसीए नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विविध विद्या शाखांतर्गत कोर्स इन किल्स इनहान्समेंटला सुरू केला जाणार आहे. तसेच विद्यापीठात नव्याने डिप्लोमा कोर्स इन प्लम्बिंग इंजिनिअरिंग सुरू करणे, संगीत व नाट्यशास्त्र विभागात भजन प्रमाणपत्र कोर्स व मराठी अधिविभागात चित्रपट प्रमाणपत्र कोर्स सुरू करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्या परिषद सदस्य, अधिष्ठाता उपस्थित होते.

26 OCT 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, को...

# औरंगाबादला सर्वसाधारण विजेतेपद

## यजमान कोल्हापूरला उपविजेतेपद; ३२ व्या राज्य तलवारबाजी स्पर्धेची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत औरंगाबाद संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. फॉईल वैयक्तिकमध्ये दोन्ही गटांत तसेच इपी व सेबरच्या दोन्ही गटांत औरंगाबादच्या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवत स्पर्धेवर वर्चस्व मिळविले. यजमान कोल्हापूर संघाला उपविजेतेपद मिळाले.

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धेचे नेटके नियोजन केले होते. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात स्पर्धेची सांगता सोमवारी झाली.

आ. चंद्रकांत जाधव, जिल्हा पोलिसप्रमुख शैलेश बलकवडे व डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. यानंतर पंच, मार्गदर्शक, राज्य पदाधिकारी यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेशकुमार मुदगल, डॉ. शिंपा शर्मा, विश्वनाथ भोसले, कार्यकारी संचालक ए. के. गुप्ता, श्रीधर स्वामी, शिवराज महाविद्यालय प्रा. किसनराव कुऱ्हाडे, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे अशोक दुधारे, प्रकाश काटोळे, उदय डोंगरे, राजकुमार सोमवंशी आदी उपस्थित होते. संयोजन अध्यक्ष संजय जाधव, सचिव विनय जाधव, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. बाबासाहेब उलपे, प्राचार्य महादेव नरके, डॉ. राम पोवार, गजानन बेडेकर, राहुल मगदूम, प्रफुल्ल धुमाळ, संदीप जाधव, संभाजी मिरजे, दीपक क्षीरसागर व पदाधिकारी-सहकाऱ्यांनी केले.

अखेरच्या दिवशी सेबर सांघिक प्रकारात औरंगाबाद संघाने महिला व पुरुष या दोन्ही गटांत सुवर्णपदके प्राप्त केले. महिला गटात कशीश भरड, संस्कृती पडुल, अपूर्वा रसाळ व गार्गी डोंगरे यांचा समावेश असलेल्या औरंगाबाद संघाने तेजस्विनी तारळे, दुर्गा नांदूरडीकर, आदिती सोनवणे यांचा सामवेश असलेल्या नाशिक संघावर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकले. पुरुष सांघिक गटात अभय शिंदे, श्रेयस जाधव, विशाल दानवे व वाघ यांच्या औरंगाबाद संघाने कोल्हापूर संघाला पराभूत करत सुवर्णपदकावर नाव कोरले. धनंजय जाधव, प्रतीक पाटील, श्रीशैल्य शिंदे व ऋषीराज पोवार यांच्या कोल्हापूर संघाला रौप्यपदक मिळाले.




**कोल्हापूर : सर्वसाधारण विजेता औरंगाबाद संघाला चषक देऊन गौरविताना आमदार चंद्रकांत जाधव, जिल्हा पोलिसप्रमुख शैलेश बलकवडे, डॉ. संजय डी. पाटील. सोबत महाराष्ट्र राज्य फेन्सिंग असोसिएशनचे पदाधिकारी.**

### महाराष्ट्र संघाची निवड जाहीर

स्पर्धेतून २४ जणांच्या महाराष्ट्र राज्य संघाची निवड करण्यात आली. संघ पुढीलप्रमाणे : फॉईल पुरुष - शाकेर सय्यद (औरंगाबाद), अनिल मठपती (कोल्हापूर), शीव यादव (पालघर), तेजस पाटील (औरंगाबाद). फॉईल महिला - वैदेही लोहिया(औरंगाबाद), वैभवी इंगळे (मुंबई), खुशी दुखंडे (मुंबई उपनगर), अनुजा लाड (पालघर). ईपी पुरुष - प्रथमकुमार शिंदे (कोल्हापूर), गिरीश जकाते (सांगली), निखिल कोहाड (भंडारा), मोरेश्वर पाटील (सांगली). ईपी महिला - माही आरदवाड (लातूर), नम्रता यादव (पालघर), ज्ञानेश्वरी शिंदे (लातूर), वामा मनियार (पालघर). सेबर पुरुष - अभय शिंदे (औरंगाबाद), प्रतीक जाधव (कोल्हापूर), श्रीशैल शिंदे (कोल्हापूर), पार्थ जाधव (कोल्हापूर). सायबर मुली - कशीश भराड (औरंगाबाद), श्रुती जोशी (नागपूर), अपूर्वा रसाळ (औरंगाबाद), माही आरदवाड (लातूर).

26 OCT 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फेन्सिंग स्पर्धेत औरंगाबादला सर्वसाधारण विजेतेपद

## कोल्हापूर उपविजेता : ३२ वी राज्य फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

३२ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट फेन्सिंग अजिंक्यपद स्पर्धेमध्ये औरंगाबाद संघाने सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. फॉईल वैयक्तिकमध्ये दोन्ही गटात, ईपी व सायबरच्या दोन्ही गटात औरंगाबादच्या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवत स्पर्धेवर वर्चस्व सिद्ध केले. कोल्हापूर संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. आमदार चंद्रकांत जाधव व जिल्हा पोलीसप्रमुख शैलेश बलकवडे यांच्या प्रमुख उपस्थितीत डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.



**कोल्हापूर : औरंगाबाद संघाला ट्रॉफी देताना कुलपती डॉ. संजय डी. पाटील. यावेळी आ. चंद्रकांत जाधव, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात २३ ते २५ ऑक्टोबर या कालावधीत या स्पर्धा झाल्या. महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन, शिवाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर फेन्सिंग असोसिएशनने या स्पर्धेचे आयोजन केले होते.

स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी सायबर सांघिक प्रकारात औरंगाबाद संघाने महिला व पुरुष या दोन्ही गटात सुवर्णपदक प्राप्त केले. महिला गटात कशीश भरड, संस्कृती पडुल, अपूर्वा रसाळ व गार्गी डोंगरे यांचा समावेश असलेल्या औरंगाबाद संघाने तेजस्विनी तारळे, दुर्गा नांदूरडीकर, आदिती सोनवणे यांचा सामवेश असलेल्या नाशिक संघावर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकले. नाशिकला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. नागपूर आणि ठाणे संघाला कांस्यपदक मिळाले. पुरुष सांघिक गटात अभय शिंदे, श्रेयस जाधव, विशाल दानवे व निघाली वाघ यांच्या औरंगाबाद संघाने कोल्हापूर संघाला पराभूत करत सुवर्णपदकावर नाव कोरले. धनंजय जाधव, प्रतीक पाटील, श्रीशैल्य शिंदे व ऋषीराज पोवार यांच्या कोल्हापूर संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. नागपूर व पालघर संघाने कांस्यपदक मिळवले.

यावेळी डी. वाय. पाटील ग्रुपचे विश्वस्त पृथ्वीराज पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, प्र- कुलगुरू डॉ. शिंपा शर्मा, विश्वनाथ भोसले, कार्यकारी संचालक ए. के. गुप्ता, श्रीधर स्वामी, डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके, संयोजन समितीचे अध्यक्ष संजय जाधव, विनय जाधव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री सतेज पाटील यांनी महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर फेन्सिंगला वलय प्राप्त झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली कमी कालावधीत कोल्हापुरात नेटक्या नियोजनाने राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वी झाली. शिस्तबद्धपणा स्पर्धेत दिसत होता. स्पर्धक, कोच, पंच, पदाधिकारी यांची प्रत्येक बाबतीत काळजी घेण्यात आली. सर्वच मान्यवर व खेळाडूंनी याबद्दल सतेज पाटील यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.

तरूण भारत

# वायसीएमची 'पीएचडी' प्राध्यापक पदासाठी ग्राह्य धरण्यास मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी सेट–नेट आणि पीएच. डी. पदवी पूर्ण असावी, अशी अट घालण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या पाच वर्षात काहींनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. ही पीएच. डी. पदवी ग्राह्य धरायची की नाही, यावर विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मुक्त विद्यापीठाची पीएच. डी.

- शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय
- दूरशिक्षण अंतर्गत एम. बी. ए., बी. एस्सी., एम. एस्सी. विषय सुरू होणार

पदवी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे संबंधीत प्राध्यापकांना दिलासा मिळाला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असलेल्या बैठकीत ५७ विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत नवीन प्लंबिंग डिप्लोमा कोर्स सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. एलआयसी अंतर्गत विविध अभ्यासक्रमांना मान्यता देणे, एखाद्या विषयाची मान्यता काढून घेतली तर काय करायचे. यासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाने विविध पदासाठी जाहीरात देवून अर्ज मागवले आहेत. या पदांच्या मुलाखती घेवून जागा भरण्यासंदर्भात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्या परिषदेला माहिती दिली.

26 OCT 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यस्तरीय तलवारबाजीत औरंगाबादचा डंका

## सर्वाधिक सुवर्ण पदके जिंकत पटकावले सर्वसाधारण विजेतेपद, पुरुष गटात कोल्हापूर संघ उपविजेता

प्रतिनिधी
कोल्हापूर

३२ व्या वरिष्ठगट राज्यस्तर फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेत ईपी, फॉईल आणि सेबर प्रकारात सर्वाधिक सुवर्ण पदके जिंकून औरंगाबाद महिला आणि पुरुष संघाने सोमवारी सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. याचबरोबर पुरुष गटात कोल्हापूर जिल्हा संघाने तर महिला गटात पालघर जिल्हा संघाने उपविजेतेपद मिळवले. सांगली जिल्हा संघाला पुरुष गटात आणि लातुर जिल्हा संघाला महिला गटात तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले.

दरम्यान, या राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेची सोमवारी सायंकाळी सांगता झाली. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेते संघ व खेळाडूंना चषक देऊन गौरवले. यावेळी आमदार चंद्रकांत जाधव, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राकेशकुमार मुदगल, प्र–कुलगुरु डॉ. शिंपा शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. महादेव नरके, गडहिंग्लजमधील शिवराज महाविद्यालयाचे संस्थापक प्रा. किसनराव कुराडे, महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रकाश काटोळे, सचिव उदय डोंगरे, खजिनदार राजकुमार सोमवंशी, सल्लागार अशोक दुधारे, स्पर्धा संयोजन समिती अध्यक्ष संजय जाधव, डॉ. बाबासाहेब उलपे व विनय जाधव आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : राज्यस्तर तलवारबाजी स्पर्धेत सोमवारी उपविजेतेपद मिळवलेल्या कोल्हापूर जिल्हा पुरुष संघाला चषक देऊन गौरवताना डॉ. संजय डी. पाटील. शेजारी आमदार चंद्रकांत जाधव, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. राकेशकुमार मुदगल आदी.**

**फॉईल वैयक्तिकमध्ये औरंगाबादला सुवर्ण**

फॉईल वैयक्तिक पुरुष गटात औरंगाबादच्या शाकेर सय्यदने सुवर्ण, कोल्हापूरच्या अनिल मठपतीने रौप्य आणि पालघरच्या शीव यादव व औरंगाबादच्या तेजस पाटील यांनी कांस्य पदक जिंकले. महिला गटातही औरंगाबादच्या वैदेही लोहियाने मुंबईच्या वैभवी इंगळेला हरवून सुवर्णपदक मिळवले.

**भारतीय तलवारबाजी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ निवडण्यात आला. खेळाडूंची नावे अशी :** फॉईल पुरुष : शाकेर सय्यद (औरंगाबाद) अनिल मठपती (कोल्हापूर), शीव यादव (पालघर) तेजस पाटील (औरंगाबाद), फॉईल **महिला :** वैदेही लोहिया (औरंगाबाद), वैभवी इंगळे (मुंबई) खुशी दुखंडे (मुंबई उपनगर), अनुजा लाड (पालघर), ईपी **पुरुष :** प्रथमकुमार शिंदे (कोल्हापूर), गिरीश जकाते (सांगली), निखील कोहाड (भंडारा), मोरेश्वर पाटील (सांगली), ईपी महिला : माही आरदवाड (लातूर), नम्रता यादव (पालघर), ज्ञानेश्वरी शिंदे (लातूर), वामा मनियार (पालघर), सेबर पुरुष : अभय शिंदे (औरंगाबाद), प्रतिक जाधव (कोल्हापूर), श्रीशैल शिंदे (कोल्हापूर), पार्थ जाधव (कोल्हापूर).

**सेबर वैयक्तिक प्रकारात औरंगाबाद, कोल्हापूरचा दबदबा**

सेबर वैयक्तिक प्रकारात औरंगाबादच्या महिला व पुरुष तलवारबाजांनी सुवर्ण पदक प्राप्त करुन वाहवा मिळवली. कोल्हापूरच्या प्रतिक जाधवने रौप्य आणि कोल्हापूरच्याच श्रीशैल शिंदे व पार्थ जाधव यांना कांस्यपदक मिळाले. महिला गटातही औरंगाबादच्या कशिश भराडने सुवर्ण पदक जिंकले. नागपूरच्या श्रुती जोशीला रौप्य तर औरंगाबादच्या अपुर्वा रसाळ व लातूरच्या माही आरदवाडला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले.